आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३ फेब्रुवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर चर्चा सुरु
- त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक लोकसभेत सादर
- कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराची व्यवहार्यता तपासून पाहावी, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश
- सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाला बीसीसीआयकडून ५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे महाराष्ट्राला १३ सुवर्ण पदकांसह एकूण ५५ पदकं

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभमेळाव्यात झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरुन आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे प्रचंड गदारोळ झाला. महाकुंभ व्यवस्थापनात ढिसाळपणा झाल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात या दुर्दैवी घटनेचा उल्लेख केला होता.

अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान सदस्यांना आपलं म्हणणं मांडता येईल असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. त्यानंतर लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चा सुरु झाली आहे. भाजपाचे रमेश बिधुडी यांनी चर्चेचा प्रारंभ केला. राज्यसभेतही आभारप्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात झाली. भाजपाच्या किरण चौधरी यांनी चर्चेला प्रारंभ केला. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने व्यापक उपाययोजना केल्या असून विरोधक यासंदर्भात अपप्रचार करत आहेत असं त्या म्हणाल्या. राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर महाकुंभाच्या मुद्द्यावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. या आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात काँग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२५ आज लोकसभेत सादर करण्यात आलं. गुजरातमधे आणंद इथं हे विद्यापीठ स्थापन होणार असून सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट गाठण्याच्या हेतूने व्यवस्थापकीय आणि तांत्रिक शिक्षण तिथे दिलं जाईल. केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर यांनी विधेयक सभागृहात सादर केलं.

लोकसभेत आज वक्फ सुधारणा विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर होणार आहे. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील या समितीनं पडताळलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहासमोर ठेवली जाईल. संयुक्त संसदीय समितीने मसुदा अहवाल आणि सुधारित विधेयक स्वीकारलं असून काही सदस्यांनी असहमतीच्या नोंदी केल्या आहेत.

**<><><><><>**

आशियातलं सर्वात मोठं विमानतळ असलेल्या जेवर या नॉयडा इथल्या विमानतळावरून येत्या एप्रिल महिन्यापासून नियमित हवाई वाहतूक सुरु होईल, असं केंद्रीय मंत्री के राममोहन नायडू यांनी आज राज्यसभेत सांगितलं. आपला देश ही हवाई वाहतूक क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी बाजारपेठ असल्याचं त्यांनी या संदर्भातल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. उडान विस्तार योजनेअंतर्गत येत्या १० वर्षांमध्ये १०० नवीन विमानतळं देशभरात सुरु होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणूक तसंच उत्तर प्रदेश आणि तमिळनाडूतल्या पोटनिवडणुकीसाठी एक्झिट पोल म्हणजे मतदानोत्तर चाचणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने बंदी घातली आहे. येत्या बुधवारी म्हणजेच मतदानाच्या दिवशी सकाळी ७ पासून संध्याकाळी साडेसहापर्यंत हे बंदी आदेश लागू

राहतील. त्याचप्रमाणे मतदानापूर्वी ४८ तास प्रसारमाध्यमांना कोणत्याही प्रकारचे ओपिनियन पोल प्रसिद्ध करता येणार नाहीत.

या निवडणुकांसाठी प्रचाराची मुदत आज संध्याकाळी संपत आहे. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी तसंच तमिळनाडू आणि उत्तरप्रदेशातल्या प्रत्येकी एका पोटनिवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होईल. मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे.

**<><><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या एन व्ही एस - झीरो टू या उपग्रहाला नियोजित कक्षेत जाण्यात अपयश आलं आहे. उपग्रहाला नियोजित कक्षेत स्थापित करणाऱ्या थ्रस्टरच्या झडपा वेळेवर उघडल्या नाहीत, असं इसरोतर्फे सांगण्यात आलं. संबंधित तांत्रिक अडथळा दूर करण्याच्या दृष्टीनं पर्यायी व्यवस्थेचा वापर केला जात आहे, असंही इसरोनं म्हटलं आहे. हसन इथली मुख्य नियंत्रण यंत्रणा परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे, उपग्रहाच्या इतर सर्व यंत्रणा तंदुरुस्त आहेत, सध्या उपग्रह लंबगोल कक्षेत असून त्यावरची सौर पॅनेल्स कार्यान्वित झाली आहेत, इत्यादी माहिती यात नमूद केली आहे.

**<><><><><>**

कृषी क्षेत्रात एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन असून त्यासाठी व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या संदर्भात पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते. पीक आरोग्याचं विश्लेषण, मातीतल्या कार्बनचं प्रमाण शोधणं, मातीच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती, तणाचे प्रकार ओळखणं, मातीचं तापमान, पिकांवरची कीड तसंच रोगांचा प्रादुर्भाव ओळखणं एआयच्या वापरामुळे शक्य होणार आहे. त्यामुळे एआयच्या प्रायोगिक तत्त्वावर वापरासाठी या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश अजित पवार यांनी दिले.

**<><><><><>**

इंग्लंडचे राजे चार्ल्स यांचे धाकटे बंधू प्रिन्स एडवर्ड हे सध्या मुंबई भेटीवर असून त्यांनी काल राजभवनात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारत आणि ब्रिटनमधले संबंध मजबूत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं तसंच दोन्ही देशांमधे सहकार्याची भावना वाढीला लागावी, अशी इच्छाही व्यक्त केली. भारतात क्रिकेट या खेळाची लोकप्रियता नमूद करून बॅडमिंटनमधल्या भारताच्या प्रगतीचंही त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ बीसीसीआयने ५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. १९ वर्षांखालील भारतीय महिला संघाने पहिला टी-२० विश्वचषक २०२३मध्ये शेफाली वर्मा हिच्या नेतृत्वाखाली जिंकला होता. तर निकी प्रसाद हिच्या नेतृत्वाखालील महिला संघाने दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरलं.

**<><><><><>**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २५ रौप्य आणि १७ कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्राने सर्वाधिक ५५ पदकं जिंकली आहेत.

सेना दल संघाला १८ आणि कर्नाटकला १७ सुवर्णपदकं मिळाली आहेत. मात्र सेना दल संघाला १० रौप्य आणि ८ कांस्य तर कर्नाटकला ९ रौप्य आणि ९ कांस्य पदकं असल्याने सेना दल संघ पदकतालिकेत पहिल्या स्थानावर आहे, तर कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे. तर मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश ९ सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे. तामिळनाडू आणि हरियाणानेही स्पर्धेत चांगल्या खेळाचं प्रदर्शन केलं आहे. तामिळनाडूने ८ तर हरियाणाने ६ सुवर्ण पदकं जिंकली आहेत. याशियाव केरळ, दिल्ली आणि उत्तर प्रदेशाचे संघ देखाली पदकतालिकेत पहिल्या

दहा संघामधे आहेत. यजमान उत्तराखंडच्या खात्यात आतापर्यंत केवळ एक सुवर्ण पदक पडलं आहे.

**<><><><><>**

टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद आर. प्रज्ञानंद यानं पटकावलं आहे. काल झालेल्या सामन्यात त्याने सध्याचा विश्वविजेता डी. गुकेशवर विजय मिळवला. प्रज्ञानंद आणि गुकेश दोघेही १३ फेऱ्यानंतर साडे आठ गुणांसह बरोबरीत होते.

**<><><><><>**

३७ व्या पक्षिमित्र संमेलनाचा समारोप काल अहिल्यानगर जिल्ह्यात शेवगाव इथे झाला. पक्षी संवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरण संतुलनाचं उल्लेखनीय काम महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना करीत आहे, त्यासाठी शासनाकडे सतत पाठपुरावा करून विविध प्रकल्प मार्गी लावावेत, असं मत या संमेलनात व्यक्त झालं. या दोन दिवसीय संमेलनात पक्षी संवर्धनाशी संबंधित मुद्द्यांवर उहापोह झाला,  तसंच जायकवाडी इथे पक्षी निरीक्षणही करण्यात आलं. राज्यभरातून अनेक पक्षीप्रेमी या संमेलनात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या हळदी-काडगाव मार्गावर काल रात्री एका खासगी बसला झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी झाले. जखमींना छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. ही बस गोव्याहून छत्रपती संभाजीनगरकडे जात होती. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या एका खासगी कंपनीचे १४५ कर्मचारी ४ बसमधून गोव्याला सहलीसाठी गेले होते.त्यातली एक बस अपघातग्रस्त झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**//<><><><><>//**